**ठळक बातम्या**

- भारत लवकरच जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल असा प्रधानमंत्र्यांना विश्वास / दिल्लीतल्या १२ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं केलं उद्घाटन आणि लोकार्पण
- महाकुंभमेळ्यासाठी रेल्वे १३ हजार गाड्या सोडणार
- प्रदेश भाजपाच्या विशेष सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात
- बॉर्डर-गावस्कर कसोटी क्रिकेट मालिका ऑस्ट्रेलियानं ३-१ अशी जिंकली / भारताचा जसप्रीत बुमराह ठरला मालिकावीर

**आणि**

- टेनिसपटू सुमित नागल ASB टेनिस स्पर्धेच्या मुख्य फेरीत दाखल

**<><><><><>**

भारत लवकरच जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राजधानी दिल्लीत रेल्वे, मेट्रो आणि आरोग्याशी संबंधित १२ हजार २०० कोटी रुपयांच्या योजनांचं उद्घाटन आणि लोकार्पण झालं, त्यानिमत्तानं रोहिणी इथं झालेल्या कार्यक्रमला ते संबोधित करत होते. येत्या २५ वर्षांत भारत विकसित देश झालेला आपण पाहू आणि दिल्लीला या विकसित देशाची राजधानी म्हणून अधिक विकसित करण्याचा मनोदय

त्यांनी व्यक्त केला. दिल्ली-गाझियाबाद - मेरठ नमो भारत कॉरिडॉरच्या १३ किलोमीटर लांबीच्या विस्तारीत मार्गाचं उद्घाटन करून त्यांनी दिल्लीला पहिल्या नमो भारत रेल्वे गाडीची भेट दिली. दिल्ली मेट्रोच्या चौथ्या टप्प्याच्या विठाला कुंडली क्षेत्राची पायाभरणी त्यांच्या हस्ते झाली. दिल्लीतील रोहिणी इथल्या केंद्रीय आयुर्वेद संशोधन संस्थेच्या नवीन अत्याधुनिक इमारतीच्या कामाचं भूमिपूजनही त्यांच्या हस्ते झालं.

या कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी गाजियाबाद जिल्ह्यातल्या साहिबाबाद रेल्वे स्थानक ते दिल्लीतील न्यू अशोकनगर रेल्वेस्थानकादरम्यान नमो भारत रेल्वेनं प्रवासही केला. प्रवासादरम्यान त्यांनी शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या चिमुकल्यांनी प्रधानमंत्र्यांना कविता म्हणून दाखवल्या तसंच स्वतः काढलेली चित्रं भेट दिली. त्यानंतर त्यांनी विविध योजना आणि प्रकल्पांचं उद्घाटन,लोकार्पण आणि पायाभरणी केली.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात प्रगायराज इथं होणार असलेल्या महाकुंभ मेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविक आणि यात्रेकरुंच्या सोयीसाठी भारतीय रेल्वे १३ हजार गाड्या चालवणार आहे. यात १० हजार नियमित आणि ३ हजार विशेष गाड्यांचा समावेश आहे. कुंभमेळ्या आधी आणि नंतर दोन ते ती अतिरिक्त दिवस असे मिळून ५० दिवस या गाड्या चालवल्या जातील अशी माहिती रेल्वे व्यवस्थापनानं दिली आहे. या मेळाव्याला मोठ्या संख्येनं भाविक आणि

यात्रेकरू येण्याची शक्यता गृहीत धरून गर्दी टाळण्यासाठी लोकांची वर्दळ एकमार्गी ठेवण्याचं नियोजन केलं असल्याचंही रेल्वेनं कळवलं आहे.

प्रगायराज इथं येत्या १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत हा महाकुंभ मेळा होणार आहे.

<><><><><>

नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचं संरक्षण करणं हा डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायद्याच्या मसुद्याचा उद्देश आहे. असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. नागरिकांच्या डिजिटल स्वरुपातल्या वैयक्तिक तपशीलांची गोपनीयता कायम राखण्यासाठी कायद्याची चौकट मजबूत करण्याच्या हेतूने ही नियमावली तयार करण्यात आली आहे. सर्व घटकातल्या भागधारकांच्या गरजा आणि जगभरातल्या सर्वोत्तम पद्धतींचा अभ्यास करून हा मसुदा तयार करण्यात आला आहे. या मसुद्याला कायद्याचं स्वरूप देण्यापूर्वी नागरिकांनी या नियमावलीच्या मसुद्याविषयीचे आपले अभिप्राय आणि सूचना MyGov पोर्टलवर १८ फेब्रुवारीपर्यंत सादर कराव्यात, असं आवाहन मंत्रालयानं केलं आहे.

<><><><><>

एच एम पी या विषाणूजन्य आजाराचा प्रादुर्भाव चीनमध्ये गेल्या काही दिवसांपासून वेगानं वाढत असून केंद्र सरकारचं त्यावर बारकाईनं लक्ष असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. आय सी एम आर अर्थात

भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद येत्या काही दिवसांत देशभरात एच एम पी च्या चाचण्या करणाऱ्या प्रयोगशाळांची संख्या वाढवणार असून वर्षभरात या आजाराचा एकंदर कल आणि प्रकार याचं निरीक्षण करणार असल्याचं मंत्रालयानं सांगितलं. यासंदर्भातल्या अलिकडच्या घडामोडींचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयानं नवी दिल्लीत संयुक्त बैठक घेतली. सध्या तरी भारतात चिंताजनक परिस्थिती नसल्याचं आरोग्य सेवा महासंचालक डॉ अतुल गोयल यांनी या बैठकीत सांगितलं. या आजाराचा प्रादुर्भाव भारतासह जगभरात सुरु असला तरी भारतात श्वसनासंदर्भातल्या आजारांबाबत योग्य ते उपचार आणि जागरूकता आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

नवी दिल्लीत सुरु असलेल्या ग्रामीण भारत महोत्सवात ग्रामीण भागातल्या उद्योजकतेचा सन्मान आणि सांस्कृतिक वारशाचा गौरव साजरा केला जात आहे, असं नाबार्डचे अध्यक्ष शाजी के व्ही यांनी म्हटलं आहे. या महोत्सवात जी आय अर्थात भौगोलिक मानांकन प्राप्त उत्पादनं, नैसर्गिक उत्पादनं आणि महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करुन दिली जाते, असं त्यांनी सांगितलं. हा महोत्सव ९ जानेवारी पर्यंत सुरु आहे.

**<><><><><>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या उपस्थितीत आज उत्तर मुंबईत भाजपच्या विशेष सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात झाली.

गोयल स्वतः बोरिवली रेल्वेस्थानकाजवळ आयोजित सदस्य नोंदणी अभियानात सहभागी झाले होते. अधिकाधिक नागरिकांनी भाजपाचं सदस्यत्व स्वीकारावं, असं आवाहन गोयल यांनी यावेळी केलं. उत्तर मुंबईतल्या मालाड, बोरिवली, कांदिवली,चारकोप, दहिसर विधानसभा क्षेत्रात आयोजित सदस्य नोंदणी अभियानालाही गोयल आज उपस्थित राहणार आहेत. आजपासून भाजपानं राज्यव्यापी विशेष सदस्य नोंदणी अभियान सुरु केलं आहे. एका दिवसात किमान २५ लाख नवीन सदस्य नोंदणी करण्याचं मोहिमेचं उद्दिष्ट आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे नागपूरमधे या मोहिमेत सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

राज्यात नव्यानं मोठी सहकार चळवळ उभी करण्याची गरज असून येत्या पाच वर्षात १० हजार सहकारी संस्था उभारण्याचं राज्य सरकारचं धोरण आहे, असं सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी म्हटलं आहे. ते आज सोलापूर इथं बोलत होते. पाटील यांनी आपल्या सोलापूर दौऱ्यात सहकार चळवळीचा आढावा घेतला. सहकारी संस्थाना पतपुरवठा करणं आणि वसुली करणं या पलीकडे जाऊन त्यांना सहकारी तत्वावर वेगवेगळे उद्योग करण्याची परवानगी दिली जाईल, असं ते म्हणाले. सहकारी दूधसंघात अध्यक्ष आणि राजकारणी लोकांनी केलेल्या आर्थिक घोटाळ्यांमुळे हे क्षेत्र अडचणीत आलं आहे, सहकारी चळवळ टिकवायची आणि वाढवायची

असेल तर कायद्या सुसूत्रता आणून कठोर भूमिका घेणे आवश्यक आहे, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

सक्तवसुली संचालनालयाच्या मुंबई विभागानं सुमारे ४ हजार ९५७ कोटी रुपयांच्या  कर्ज व्यवहार घोटाळ्याप्रकरणी मुंबई आणि दिल्ली इथल्या १४ ठिकाणांवर छापे घातले असून त्यामध्ये प्रतिभा इंडस्ट्रीज या कंपनीच्या कार्यालयाचा समावेश आहे. या कारवाईत 5 कोटी 4 लाख  रुपयांची  बँक खाती आणि म्युच्युअल फंड गोठवण्यात आले आहेत तसंच स्थावर मालमत्ता बळकावण्यासंदर्भातही  पुरावे सापडले आहेत. बँक ऑफ बडोदाने दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे केंद्रीय अन्वेषण ब्युरोनं दाखल केलेल्या प्राथमिक माहिती अहवालाच्या आधारे ही कारवाई केली जात आहे.

**<><><><><>**

नांदेड मध्ये पाटबंधारे नगर भागात ६ एप्रिल २००६ रोजी झालेल्या स्फोट प्रकरणी नांदेड जिल्हा सत्र न्यायालयानं १२ जणांची निर्दोष मुक्तता केली आहे. या स्फोटात दोन जण ठार झाले होते. या प्रकरणाच्या पोलीस तपासात वेगवेगळ्या बाबी पुढे आल्या होत्या. त्यानंतर तो  सीबीआय कडे सोपवण्यात आल्यानंतर सी बी आयनं सखोल तपास करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केलं होतं.  या खटल्याच्या सुनावणीत ४० साक्षीदारांची साक्ष

घेण्यात आली, मात्र सीबीआय, हा स्फोट बॉम्बस्फोट असल्याचं सिद्ध करू शकली नाही.

<><><><><>

नांदेड जिल्ह्यात माळेगाव यात्रेतल्या शासकीय कार्यक्रमांचा आज समारोप होत आहे. या यात्रेत कुस्त्यांची दंगल आज होणार असून, आठवडाभरात झालेल्या विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळाही होणार आहे. काल या स्पर्धेत नागरिकांनी शंकरपटाचा थरार अनुभवला. ५८ बैलजोड्यांनी या शर्यतीत भाग घेतला होता. त्यापैकी हिंगोली जिल्ह्याच्या औंढा तालुक्यात पिंपळदरी इथले महादू कोंडिबा रिटे यांच्या बैलजोडीने निर्धारित अंतर अवघ्या साडे चार सेकंदात पार करत पहिला क्रमांक पटकावला.
<><><><><>

राज्याचे पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते काल धुळे जिल्हा परिषदेत ११ नवीन रुग्णवाहिकांचं लोकार्पण करण्यात आलं. धुळे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातल्या प्राथमिक आरोग्य केंद्राना राज्यस्तरावरुन या ११ नविन रुग्णवाहिका प्राप्त झाल्या होत्या.

<><><><><>

बॉर्डर-गावस्कर कसोटी क्रिकेट मालिका ऑस्ट्रेलियानं ३-१ अशी जिंकली आहे. सिडनी इथं झालेल्या पाचव्या सामन्यात आजच्या तिसऱ्या दिवशी

भारतीय संघानं दिलेलं १६२ धावांचं लक्ष्य ऑस्ट्रेलिया संघानं ४ गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केलं.

**<><><><><>**

भारतीय टेनिसपटू सुमित नागलने न्यूझीलंडमध्ये सुरू असलेल्या एएसबी क्लासिक टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या मुख्य फेरीत प्रवेश केला आहे. त्याने आज सकाळी पात्रता फेरीच्या अंतिम सामन्यात फ्रान्सच्या एड्रियन मॅनारिनोचा पराभव केला.

**//<><><><><>//**